# 10 मार्च

## आजचा सुविचार :

अपयश ही यशाची पहिली पायरी आहे.

## आजचे पंचांग :

वार – गुरुवार | दिनांक : 10 मार्च 2022

मास - फाल्गुन | नक्षत्र – रोहिणी

सूर्योदय – सकाळी 6. 45 वाजता | सायंकाळी 6. 42 वाजता

## आजचे दिनविशेष :

सन 1876 साली अमेरिकन संशोधक अलेक्झांडर ग्राहम बेल यांनी टेलीफोन(दूरध्वनी) चा शोध लावला होता.

सन 1929 साली मराठी कवी मंगेश पाडगावकर यांचा जन्मदिन.

सन 1897 साली भारतीय समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि कवयित्री तसेच, पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचे निधन.

## आजचे इंग्लिश शब्द : ( Flowers / फुले ) :

1) Give – देणे 2) Gold : सोने 3) Grab – पकडणे 4) Grain : धान्य

## आजची प्रश्नमंजुषा :

1) आपल्या जिल्ह्याचे नाव काय आहे?

2) काळ किती व कोणते?

3) Elephant या शब्दामध्ये किती अक्षरे आहेत?

4) चार अपारदर्शक वस्तूंची नावे सांगा.

आजची बोधकथा :

## बढाईखोर माणूस

एक माणूस फार वर्षे प्रवास करून आपल्या घरी आला व आपण परदेशात असताना काय मौजा पाहिल्या हे त्याने आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना तिखट मीठ लावून सांगितले. आणि अगदी शेवटी एक थाप ठोकून दिली की, 'मी अलकावतीला गेलो असता तेथील लोक पंधरा पंधरा हात उंच उड्या मारतात पण त्यांनी माझ्याशी पैज लावली असता माझ्याइतकी उंच उडी एकालाही मारता आली नाही.' ऐकणाऱ्या कोणालाही ही गोष्ट खरी वाटली नाही. तेव्हा त्यांची खात्री करण्यासाठी तो नाना प्रकारच्या शपथा घेऊन लागला. त्या वेळी त्या लोकातील एक माणूस त्याला म्हणाला, 'अहो, अशा शपथा कशाला घेता. हातच्या कंकणाला आरसा कशाला ? या वेळी तुम्ही अलकावतीला आहात असं समजून तिथे जशी उडी मारली तशी इथंही मारून दाखवा म्हणजे झालं.' हे ऐकताच त्या बढाईखोर माणसाचे तोंड ताबडतोब बंद झाले.

तात्पर्य – आपण प्रवासात पाहिलेल्या गोष्टी फुगवून सांगण्याची काही लोकांना सवय असते, पण एखादेवेळी त्यांचेच बोलणे त्यांच्या गळ्यात येऊन त्यांची फजिती झाल्याशिवाय राहात नाही.